राज्यातील मोटार वाहन विभागाकरिता संगणक, लॅपटॉप व लेझर प्रिंटर खरेदी करण्यासाठी रु.४,९८,७६,५१२/- इतकी रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०११७/प्र.क्र.१०/परि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: ०६ नोव्हेंबर, २०१७

वाचा :-

१) परिवहन आयुक्त यांचे क्र.TCO/DESK-11/COMP/HARDWARE/ON 11038, दिनांक २५.०७.२०१७ चे पत्र.
२) परिवहन आयुक्त यांचे क्र. पआ/ का.११/ संगणक/ हार्डवेअर खरेदी/२०१७-१८/ जा.क्र.११९३६, दि.११.०८.२०१७ चे पत्र.
३) शासनाचे समक्रमांकाचे दि.३१.०८.२०१७ चे ज्ञापन.
४) परिवहन आयुक्त यांचे क्र. पआ/ का.११/ संगणक/ हार्डवेअर खरेदी/२०१७-१८/ जा.क्र.१२७३८, दि.०७.०९.२०१७ चे पत्र.

प्रस्तावना :-

राज्यातील मोटार वाहन विभागात शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणीकरिता स्टॉल या संगणकीय यंत्रणेची उभारणी करण्यासाठी व कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असणा-या ७९३ संगणक संच, १०८ लॅपटॉप तसेच १७६ लेझर प्रिंटर इ.ची खरेदी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून करण्याच्या प्रस्तावास शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक ३ दि.३१.०८.२०१७ च्या ज्ञापनान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर संगणकीय यंत्रणेसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाने दिलेल्या PROFORMA INVOICE नुसार रु.४,९८,७६,५१२/- (रुपये चार कोटी अठ्याण्णव लक्ष शहात्तर हजार पाचशे बारा फक्त) इतकी रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील मोटार वाहन विभागातील शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणीकरिता स्टॉल या संगणकीय यंत्रणेची उभारणी करण्यासाठी व कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असणा-या ७९३ संगणक

संच, १०८ लॅपटॉप तसेच १७६ लेझर प्रिंटर इ.ची खरेदी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून करण्यासाठी रु.४,९८,७६,५१२/- (रुपये चार कोटी अठ्ठयाण्णव लक्ष शहात्तर हजार पाचशे बारा फक्त) इतकी रक्कम संक्षिप्त देयकावर काढण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

उपरोक्त रक्कम संक्षिप्त देयकाआधारे (Abstract Bill) "महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळ लि. मुंबई (M/s Maharashtra Information Technology Corporation Limited)" यांना आहरित करावी. त्यासाठी लेखा अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय यांना "आहरण व संवितरण अधिकारी " घोषित करण्यात येत आहे.

२. सदर शासन मंजूरी खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

१) शासन परिपत्रक क्र.मविनि/१०१६-प्र.क्र./१६/६,विनियम, दिनांक ४ मार्च २०१६ मधील सुचनेनुसार (२०४१ ०२९७) या लेखाशिर्षाखाली दि.३१.०३.२०१७ यापुर्वीचे तपशिलवार देयक प्रलंबित नाही.

२) दि.३१.०३.२०१७ नंतर संक्षिप्त देयकावर काढलेल्या सर्व तपशिलवार देयकांचा तत्परतेने निपटारा करण्यात येईल.

३) देयकाचे या संक्षिप्त तपशिलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

४) खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

५) या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची व्यक्तिगत जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील.

६) मासिक निधी विवरणपत्रानुसार या करीता निधी उपलब्ध आहे.

३. सदरचा खर्च, गृह विभाग मागणी क्र.बी-३, २०४१-वाहनांवरील कर (०१)(०४) कार्यालयीन अभिलेख्यांचे संगणकीकरण (मोटार वाहन), २०४१ ०२९७ (१३) कार्यालयीन खर्च- योजनांतर्गत या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.४७६/२०१७/विनियम, दि.२७.१०.२०१७ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०६१६२५३९०९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2017.11.06 16:29:20 +05'30'

(द.ह. कदम)

अवर सचिव, गृह (परिवहन) विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.राज्यपाल, यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरिक्षा)/ (लेखा वअनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर
६. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. परिवहन उप आयुक्त (प्रशासन / लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०.उप सचिव नियोजन विभाग/वित्त विभाग/व्यय-८/विनियम/साप्रवि/मातंस/३९, मंत्रालय, मुंबई
११.Head PMU,M.I.T.C. limited (Maha IT), मंत्रालय, मुंबई
१२.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग.
१३.निवड नस्ती, परि-४.